मंत्रालयीन सेवा

महाराष्ट्र शासन
विधि व न्याय विभाग
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.

दूरध्वनी क्र ०२२-२२७९३२३०
Email ID : priyanka.bapardekar@nic.in

---

क्रमांक: सामग्री- २०२३/प्र.क्र.५२/का. ७ दिनांक : २२ नोव्हेंबर, २०२३.

प्रति,
संचालक, (माहिती तंत्रज्ञान)
सामान्य प्रशासन विभाग,
विस्तार इमारत, ७ वा मजला,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

**विषय:-** विधि व न्याय विभाग (खुद्द) मंत्रालय, मुंबई साठी संगणक, प्रिंटर्स व स्कॅनर दुरुस्तीकरीता दरपत्रक उपलब्ध करुन देण्याबाबत.

महोदय,

उपरोक्त विषयासंदर्भात आपणांस कळविण्यात येते की, विधि व न्याय विभाग (खुद्द) साठी संगणक संलग्न सामग्री की बोर्ड, माऊस, ३२ जी बी पेनड्राईव्ह, सी. डी., Hard disk, स्पाईक गार्ड, नवीन टोनर व ड्रम (कॅनॉन, ब्रदर, एच पी) इत्यादी खरेदी करण्यासाठी दरपत्रके सादर करण्याबाबतची जाहिरात महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करावयाची असून सदर निविदा जाहिरात दिनांक २२.११.२०२३ रोजी प्रकाशित करावी. सोबत निविदा जाहीरातीचा मजकूर सोबत जोडला आहे.

(प्रि. नि. बापर्डेकर)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

सोबत :- सहपत्र

महाराष्ट्र शासन
विधि व न्याय विभाग
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.

दूरध्वनी क्र ०२२-२२७९३२३०
Email ID : priyanka.bapardekar@nic.in

---

क्रमांक: सामग्री- २०२३/प्र.क्र.५२/का. ७ दिनांक : २२ नोव्हेंबर, २०२३.

## निविदा सूचना

**विषय:-** विधि व न्याय विभाग (खुद्द), करिता संगणक संलग्न सामग्री खरेदी करण्यासाठी दरपत्रक उपलब्ध करुन देण्याबाबत.

विधि व न्याय विभाग (खुद्द) महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई या विभागाला कार्यालयीन कामकाजासाठी आवश्यक संगणक संलग्न सामग्री खरेदी करण्याकरीता मोहोरबंद निविदा मागविण्यात येत आहेत.

२. मोहोरबंद लिफाफ्यावर "संगणक संलग्न सामग्री खरेदी दरपत्रक निविदा-२०२३-२४" असे स्पष्टपणे लिहिणे आवश्यक आहे. निविदेच्या अटी व शर्ती विचारात घेऊन संगणक सामुग्री पुरविण्याबाबतचे दर पत्रक लिफाफा (सोबत जोडलेल्या नमुन्यात) कार्यासन अधिकारी (कार्यासन-७), दालन क्रमांक ३५३, तिसरा मजला, विधि व न्याय विभाग, मंत्रालय, हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई ४०० ०३२ यांच्याकडे **दिनांक १ डिसेंबर, २०२३ रोजी दु. ५.०० वाजेपर्यंत पोहोचतील अशा रितीने पाठवावेत.** त्यानंतर आलेल्या निविदा स्वीकारण्यात येणार नाहीत. निविदा सादर करताना खालील सूचनांचे अवलोकन करावे. सदर निविदा प्राप्त झाल्यानंतर त्यावर नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.

**निविदा सादर करताना खालील अटी-शर्तीचे अवलोकन करावे :-**

१. निविदा फॉर्मवर निविदाधारकाची सही व शिक्का असणे बंधनकारक आहे.

२. एका पुरवठादारास एकच निविदा सादर करता येईल.

३. कोणतीही एक अथवा सर्व निविदा नाकारण्याचा, संपूर्ण प्रक्रिया पूर्णपणे किंवा निविदा स्वीकृतीच्या कोणत्याही टप्प्यावर कोणतेही कारण न देता थांबविण्याचा किंवा रद्द करण्याचा अधिकार शासन राखून ठेवत आहे.

४. निविदाधारकाच्या कंपनीचा संपूर्ण तपशिल.

५. वस्तू सेवाकर (GST) नोंदणी क्रमांक तसेच GST भरत असल्याचे प्रमाणपत्र.

६. GST कर वगळून दर सादर करणे आवश्यक राहील.

७. मागणी केल्यानुसार वस्तूंचे दर GEM पोर्टलवरील L१ पेक्षा जास्त दर नसावेत.

८. विभागाच्या मागणीनुसार संगणक संलग्न सामग्री चांगली असावी.

९. संगणक संलग्न सामग्री खरेदीबाबतचे देयक या विभागास सादर करावीत. सदर देयकांतून नियमानुसार TDS (IT+GST) व इतर करांची रक्कम कपात करुन आपणांस या विभागाकडून देयके अदा करण्यात येतील. प्रशासकीय कारणास्तव देयक अदायगीस विलंब झाल्यास, अदायगीच्या रक्कमेवर व्याज अनुज्ञेय असणार नाही.

१०. संगणक संलग्न सामग्री समाधानकारक नसल्यास, कोणतेही कारण न देता परत करण्याचे अधिकार प्रधान सचिव व विधि परामर्शी विधि व न्याय विभाग, मंत्रालय यांच्याकडे राहतील. सदर अटी व शर्तींच्या अधीन राहून सेवासुविधा पुरविणे आपणास बंधनकारक राहील.

(प्रि. नि. बापर्डेकर)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत, निवड नस्ती, का.७.